मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीस मान्यता देण्याबाबत- अतिरिक्त सूचना

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन शुद्धिपत्रक क्रमांक : कौविउ-२०२४/प्र.क्र. ११८/प्रशा-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ सप्टेंबर, २०२४.

**संदर्भ** -:

१) शासन निर्णय संकिर्ण-२०२४/प्र. क्र. ९०/व्यशि-३, दि. ०९.०७.२०२४.
२) शासन निर्णय समक्रमांक दि. ०९.०९.२०२४.
३) शासन शुद्धिपत्रक समक्रमांक दि. १६.०९.२०२४.

**प्रस्तावना:-**

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता संदर्भाधीन दि. ०९.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना" कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेचा व्यापक प्रचार होऊन अधिकाधिक उमेदवारांना कार्यप्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन दि. ०९.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये अतिरिक्त सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तद्नंतर दि. १६.०९.२०२४ च्या शासन शुद्धिपत्रकान्वये दि. ०९.०९.२०२४ च्या शासन निर्णयातील अनुक्रमांक ६ येथील उद्योग आधार/उद्योग उद्यम यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतील (MSME) आस्थापनांना कार्यप्रशिक्षणाकरिता निवडण्यासाठी उमेदवारांची संख्या निश्चित करण्याबाबत बदल करण्यात आले आहेत. तथापि, मा. मंत्रिमंडळाच्या दि. २३.०९.२०२४ च्या बैठकीत प्राप्त निदेशांनुसार सदर शुद्धिपत्रक अधिक्रमित करण्यात येत आहे. तसेच, दि. ०९.०९.२०२४ च्या शासन निर्णयातील अनुक्रमांक ६ येथील उद्योग आधार/उद्योग उद्यम यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतील (MSME) आस्थापनांना कार्यप्रशिक्षणाकरिता निवडण्यासाठी उमेदवारांची संख्या निश्चित करण्याबाबत पुढीलप्रमाणे शुद्धीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन शुद्धिपत्रक :**

संदर्भाधीन दि. १६.०९.२०२४ चे शासन शुद्धिपत्रक याद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन दि. ०९.०९.२०२४ च्या शासन निर्णयातील अनुक्रमांक ६ येथील प्रथम परिच्छेद वगळण्यात येत असून त्या ऐवजी पुढील परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे:-

६) उद्योग आधार/उद्योग उद्यम यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतील (MSME) आस्थापनांना खालील प्रमाणात उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी रुजू करुन घेता येतील:-

| उद्योग उद्यम यांच्याकडे नोंदणीकृत MSME आस्थापनांतील कार्यरत मनुष्यबळाची संख्या | उत्पादन (Manufacturing) व सेवा (Service) क्षेत्रातील MSME आस्थापनांना कार्यप्रशिक्षणाकरिता निवडण्यासाठी उमेदवारांची संख्या |
|---|---|
| ५ ते १० | १ |
| ११ ते २० पर्यंत | २ |

उद्योग उद्यम यांच्याकडे नोंदणीकृत MSME आस्थापनांतील कार्यरत मनुष्यबळाची संख्या २० पेक्षा अधिक असलेल्या उत्पादन (Manufacturing) व सेवा (Service) क्षेत्रातील आस्थापनांना त्यांच्याकडील कार्यरत मनुष्यबळाच्या अनुक्रमे १० टक्के व २० टक्के उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी रुजू करुन घेता येतील.

वरील सुधारणेनुसार उमेदवार रुजू करण्यापूर्वी संबंधित आस्थापनांत होत असलेल्या कामकाजाशी संबंधित शैक्षणिक अर्हता /कौशल्य रुजू होणाऱ्या उमेदवारांकडे आहे किंवा नाही, याची खातरजमा संबंधित सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी करुन त्यास मान्यता द्यावी. तद्नंतरच उमेदवारांना संबंधित आस्थापनेत रुजू करुन घ्यावे.

३. DPIIT यांच्याकडे नोंदणीकृत स्टार्ट अप्स (Start Ups) क्षेत्रातील आस्थापनांना कार्यप्रशिक्षणासाठी उमेदवार रुजू करुन घेण्याबाबतची तरतूद कायम राहील.

सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२४०९२५१७२४१६५७०३ असा आहे. हे शासन शुद्धिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRABHAKAR ATMARAM SANKHE

Digitally signed by PRABHAKAR ATMARAM SANKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=1bac9385344f87e77e1084162b6716914d02e353160fac64808fec76c25d6d90, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2F853CAC13002D53D7034663C6F0D48D3ADE65B7222B4D38B6E5902DB13A4750, cn=PRABHAKAR ATMARAM SANKHE
Date: 2024.09.25 17:27:04 +05'30'

**( प्रभाकर संखे )**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव
४) मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
५) मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचे खाजगी सचिव
६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
१०) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

११) सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१२) सर्व जिल्हाधिकारी
१३) महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
१४) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१६) सर्व उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय,
१७) सर्व सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
१८)निवडनस्ती- कार्यासन प्रशा-२